# जागतिक वारसा स्थळ छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस

**डॉ. मधुकर विठोबा जाधव,** सहयोगी प्राध्यापक, इतिहास विभाग,यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, हलकर्णी ता. चंदगड, जि. कोल्हापूर- ४१६५५२ मोबाईल नं **:** 9975546020

---

**गोषवारा:**

पर्यटन हे सांस्कृतिक वारशाला व संस्कृतीला बळ देण्याचे प्रशंसनीय व शक्तीशाली माद्यम आहे. सांस्कृतिक वारशातुन एकता प्राप्त करून सांस्कृतिक वास्तू, प्रथा यांना एकत्र करून आपले आस्तित्त्व निर्माण करण्याचा प्रयत्न होतो. सांस्कृतिक वारशातुन सामाजिक एकतेला घट्ट बनविण्याचा प्रयत्न होताना दिसतो आहे.त्या-त्या देशाला सांस्कृतिक वारसा असतो.त्याला राष्ट्रीय सांस्कृतिक वारसा म्हणता येईल. सांस्कृतिक वारश्यामध्ये मानवाला त्यांच्या पर्वजनांकडून प्राप्त झालेल्या संस्कृतिच्या सर्व मूल्यांचा समावेश होत असतो. ही सांस्कृतिक वारशाची मूल्ये आठवणी तर ठेवली जातातच त्याचबरोबर ती संरक्षित ठेवून जपली जातात. देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईतील प्रमुख वास्तू म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस होय.

**प्रस्तावना:** भारताचा समृध्द व सांस्कृतिक वारसा म्हणून छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस श्रेष्ठ आहे. छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसला २००४ मध्ये युनोस्कोने जागतिक वारसा स्थळ म्हणून मान्यता दिली आहे. हे भारतीय मध्य रेल्वेचे एक प्रमुख स्थानक आहे. हे रेल्वे स्थानक मुंबई शहराच्या दक्षिणेला आहे. हे देशातील सर्वात व्यस्त असलेल्या रेल्वे स्टेशनपैकी महत्त्वपुर्ण स्टेशन होय. भारतीय वास्तुकलेचे एक उत्तम उदाहरण म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस होय.

**संशोधनाचे उद्देश :**

१**.**भारताचा समृध्द व सांस्कृतिक वारसा म्हणून छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसचे महत्त्व स्पष्ट करणे.

२**.** देशातील सर्वात व्यस्त असलेल्या रेल्वे स्टेशनची माहिती देणे.

**गृहीतके :**

१**.** छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस हे मुंबईची शान आहे.

२**.**छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस सांस्कृतिक, ऐतिहासिक आणि वास्तुकलेच्या दृष्टीने अतिशय वैशिष्टयपूर्ण वारसा आहे.

**संशोधन पद्धती:**

प्रस्तुत संशोधनासाठी ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आलेला आहे**.** महत्वपूर्ण अशा प्राथमिक व दुय्यम साधनांचा वापर केला आहे**.** याच बरोबर वर्तमानपत्रे**,** मासिके**,** साप्ताहिके या साधनांचा वापर करण्यात आलेला आहे**.**

**विषय विवेचन :वास्तूचे उद्धघाटन:**

२० जून १८८७ या दिवशी इंग्लंडची सम्राज्ञी राणी व्हिक्टोरियाच्या राज्याभिषेकाच्या सवुर्णजंयतीनिमित्त म्हणजेच २५वर्ष पुर्ण झाल्याच्या निमित्त या रेल्वे स्थानकाचे उद्धघाटन करण्यात आले. छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस म्हणजे एक सुंदर नक्षीकाम केलेला आराखडा आणि बुर्ज हे आश्चर्यकारक आकर्षण आहे. वायुवीजनासाठी खोल्या, व्हरांडा, तोकदार कमानी, दगडी घुमट आणि बुरूज या पायाभुत सुविधांनी या वास्तूचे बांधकाम पूर्ण होण्यास जवळ-जवळ १० वर्षे लागली.एवढा पदिर्घ कालावधी लागणारी ही पहिलीच वास्तू होय.ही वास्तू २.८५ हेक्टर जागेवर पसरली आहे. फेड्रिक विल्यम स्टीव्हन्स या ब्रिटिश इंजिनीयरच्या मार्गदर्शनाखाली या रेल्वे स्थानकाचे बांधकाम पूर्ण करण्यात आले. या कामासाठी फेड्रिक विल्यम स्टीव्हन्स यांना त्याकाळी १६ लाख १४ हजार रूपयांचे मानधन देण्यात आले होते.

**ऐतिहासिक प्रवास व नाव:**

भारतामध्ये सर्वप्रथम बोरीबंदर ते ठाणे ही पहिली रेल्वे १६ एप्रिल १८५३ साली धावली. यावेळी २१ तोफांची सलामी देण्यात आलेली होती. या रेल्वेच्या ऐतिहासिक प्रवासात आमंत्रित मान्यवरांचे भव्य स्वागत करण्यात आले. या गाडीला सिंध, सुलतान व साहिब अशा नावांची तीन इंजिन होती. ब्रिटीशांनी मुंबईच्या बोरीबंदर परिसरात हे रेल्वे स्टेशन बांधले. यावरून याला बोरीबंदर स्टेशन असे नाव देण्यात आले. ग्रेट इंडियन पेनिन्सुला रेल्वेजवळ हे स्टेशन होते.१८५३ ते १८८७ या कालखंडात छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसचे नाव बोरिबंदर असे होते. या स्थानकाला १८८७ ते १९९६

पर्यंत व्हिक्टोरिया टर्मिनस असे नाव होते. १९९६ ते २०१७ पर्यंत छत्रपती शिवाजी टर्मिनस असे होते. तर २०१७ पासून छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस असे नाव करण्यात आले आहे. सद्या हे छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस म्हणून ओळखले जाते.

**वास्तूची रचना:**

या वास्तूची रचना ही लंडनमधील सेंट पॅकार्य रेल्वे स्थानकाशी मिळती जुळती आहे. छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसचे स्थापत्य वैशिष्टयपूर्ण असे आहे. यामध्ये व्हिक्टोरियन गॉथिक, इटालियन गॉथिक आणि भारतीय पारंपारिक स्थापत्य शैलीचा संगम पहावयास मिळतो. छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस हे मुंबईतील एक ऐतिहासिक व सर्वात मोठे रेल्वे स्थानक आहे. या वस्तूवरील नक्षीकाम खूपच सुंदर आहे. छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस रचना ही व्हिक्टोरियन, इटालियन, गॉथिक, रिव्हायवल प्रकारची आहे. वास्तूच्या मुख्यभागी असलेल्या घड्याळाखाली राणी एलिझाबेतचा पुतळा होता. नंतर मात्र इ.स. १९५० साली भारत सरकारच्या आदेशानुसार सर्व इमारतींवरील ब्रिटिशांचे पुतळे हटवण्यात आले. त्यामध्ये हा पुतळाही काढण्यात आला. छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसची संपूर्ण रचना वाळूचा खडक, चुनखडी आणि इटालियन संगमरवरीने बनलेली आहे. छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस ही वास्तू आकर्षक अशी आहे. रात्रीच्या वेळी वास्तूचे आकर्षन दिव्यांनी उजळले जाते आणि त्याचे सौंदर्य पाहण्यासारखे असते.

**छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसची वैशिष्टये:**

छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसमध्ये जे जे स्कूल ऑफ आटर्सच्या विद्यार्थ्यांनी मुख्य इमारतीच्या सौंदर्याला कुठेही बाधा व हानी येणार नाही. अशा पध्दतीने लाकडी व धातूचे कोरीव काम केलेले कठडे बसवलेले आहेत. या रेल्वेस्थानकावरील बुकिंग नॉर्थ विंग मध्ये आहे. या ठिकाणी इटालियन मार्बल आणि भारतातील इंडियन स्टोन टाइल्स वापरले आहेत. त्यामध्ये सोनेरी चांदण्या बसवल्यामुळे त्याचे सौंदर्य आणखी खुलले आहे. बाहेरच्या भिंतीवर स्थापत्य,विज्ञान,कृषी, वाणिज्य यांची प्रगती दर्शविणारे पुतळे बसविण्यात आले आहेत. रेल्वे स्थानकाच्या मुख्य प्रवेशव्दारावर सिंहाची व वाघाची प्रितिमा बसवलेली आहे. छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस सांस्कृतिक, ऐतिहासिक आणि वास्तुकलेच्या दृष्टीने अतिशय वैशिष्टयपूर्ण वारसा आहे. या वास्तूचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे एकही वेलबुटटीची नक्षी दुस-या नक्षी सारखी नाही. प्रत्येक नक्षी वेगळी आहे. चित्रकला व शिल्पकला यांचा सवोत्तम नमुना येथे पाहावयास मिळतो.

**भारतातील सर्वात भव्य रेल्वे स्टेशन:**

मुंबई यथील एल्फिन्स्टन महाविद्यालय, मुंबई विद्यापीठ या वास्तू याच वस्तुकलेत बांधलेल्या आहेत.या वास्तूमध्ये रेल्वेचे एक संग्रहालय आहे.त्यामध्ये या स्थानकाचा इतिहास चित्ररूपात मांडण्यात आलेला आहे. या वास्तूच्या मुख्य इमारतीवर अनेक मनोरे आणि मध्यभागी घुमट बांधलेला आहे. सी या इंग्रजी अक्षराप्रमाणे या इमारतीची रचना आहे. इमारतीच्या मध्यभागी असलेल्या घुमटावर प्रगतीचे प्रतीक असलेला स्त्री देवतेचा पुतळा आहे. पाढ-या रंगातील ही मूर्ती छान आहे. सुमारे १८ फूट उंचीच्या या पुतळयाला दी लेडी ऑफ प्राग्रेस म्हणतात.त्या मूर्तीच्या डाव्या हातात एक चाक आहे.जे प्रगती आणि गतीशिलता दर्शवते. उजव्या हातामध्ये जळत असलेली मशाल आहे. मनो-याकडे आतील बाजूने जाणारा लाकडी जिना सुंदर नक्षीकाम केलेला आहे. तेथील दरवाजे एखाद्या शाही महालासारखे आहेत.खिडकीची तावदाने सुंदर अशी रंगविली आहेत.रंगीत काचेच्या खिडक्या, उंच शिखर घुमटादार कमानी आणि बुटके आणि प्रण्यांच्या आकृत्यासह खांब असलेले हे भारतातील सर्वात भव्य रेल्वे स्टेशन गॉथिक कलाकृती आहे. या वास्तूच्या सजावटीसाठी पांढरा चुनखडीचा वापर करण्यात आला आहे. दरवाजे आणि खिडक्यांसाठी वर्मा सागवान लाकुड वापरले आहे.

**छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसचे महत्व:**

छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस हे जागतिक वारसा स्थळ असल्यामुळे या टिकाणी जतन आणि संवर्धनाचे काम निरंतर चालू असते. छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसमध्ये एकूण १८ प्लॅटफॉर्म आहेत. त्यापैकी एक ते सात प्लाटफॉर्म मुंबईची जीवन वाहिनी असणा-या रेल्वेसाठी राखून ठेवलेले आहेत. तर आठ ते अठरा क्रमाकांच्या प्लॅटफॉर्मवरून लांब पल्याच्या पॅसेंजर म्हणजेच जलद गाडया मार्गस्थ होतात. अनेक भरतीय चित्रपटाचे शूटिंग छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस या वास्तूमध्ये झालेले आहे. स्लम डॉग मिलेनियर या चित्रपटातील जय हो हे गाणे या वास्तूत चित्रित करण्यात आलेले आहे. २०११ साली आलेल्या रावन या चित्रपटातील काही प्रसंगांचे चित्रीकरण या वास्तूत झालेले

आहे. छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस भारतातील सर्वात व्यस्त असे ठिकाण आहे. छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस या स्टेशनचा वापर दररोज जवळ जवळ तीस लाखाहून अधिक प्रवासी करतात. या स्थानकामधून दर चार ते पाच मिनिटांनी एक लोकल ट्रेन सुटते.

**ग्रीन स्टेशन:**

छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसला महाराष्ट्रातील पहिले ग्रीन स्टेशन म्हणून २०११ मध्ये सन्मानीत करण्यात आले आहे. हे ग्रीन स्टेशनचे सुवर्ण प्रमाणपत्र भारतीय उद्योग संघाच्या इंडियन ग्रीन बिल्डिंग कौन्सिलकडून देण्यात आले आहे. छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस ग्रीन स्टेशनसह स्टेशन गोल्ड अवॉर्डने सन्मानित होणारे पहिले स्टेशन आहे. सौर पॅनल लावणे, हरित क्षेत्र बनवणे, एलईडी बल्ब, अपंग व वरिष्ठ नागरिकांना कम्प्युटर सुविधा अशा अनेक वैशिष्ट्यांसाठी हे अवॉर्ड मिळाले आहे. **सोयी व सुविधा:**

छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसला भेट देणा-या पर्यटकांसाठी अनेक सोयी व सुविधा या ठिकाणी उपलब्ध आहेत. छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस स्टेशनवर स्मार्ट प्रवाशी सुविधा देण्यात येतात.त्यामध्ये वायफाय,स्वयंचलित तिकिट,वेंडिंग मशीन्स, पर्यटन माहिती व बुकिंग केंद्र, खाद्य, फार्मसी, वैद्यकीय,जेष्ठ नागरिकांसाठी अनुकुल सुविधा आणि ऊर्जा बचतीसाठीच्या योग्य उपाययोजनांचा यामध्ये समावेश आहे. स्टेशनमध्ये प्लास्टिक बॅगचा वापर टाळण्याचे आवाहन करण्यात आले आहे. प्लास्टिक बॅगचे पर्यावरणावरील प्रतिकूल परिणामांची माहिती देणारे डिजिटल डिसप्ले बोर्ड लावले आहेत. याबरोबरच प्लास्टिक प्रतिबंध संबंधी उपाय करण्यात आले आहेत.पर्यटकांना माहिती देण्यासाठी येथे माहिती केंद्र आहे. सर्व प्रवाशांसाठी विश्रांती कक्ष आहे. विविध प्रकारच्या खाद्य पदार्थाचे स्टॉल्स आणि उपहारगृह आहेत. त्याचबरोबर पुस्तकांचे स्टॉल्स, हस्तकला वस्तू, विक्री स्टॉल व दैनंदिन वस्तूंचे स्टॉल आहेत.

**सारांश:**

छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस हे मुंबईची शान आहे. ही वास्तू शहराच्या मध्य रेल्वे प्रणालीचे मुख्यालय आहे. छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस हे महाराष्ट्रातील सात आश्चर्यातील एक आश्चर्य ठरले आहे.महाराष्ट्रातील अदभुत आणि देखण्या अशा सात आश्चर्याची जून २०१३ मध्ये घोषणा करण्यात आली आहे. छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसचा परिसर हा भारतीय रेल्वेव्दारे व्यवस्थापित केलेला अतिशय कडक सुरक्षित परिसर आहे. या वास्तू भोवती ९०.२१ हेक्टरचा बफर झोन आहे.

**संदर्भ ग्रंथ :**

१. काळे-पाटसकर भागश्री, जगप्रसिद्ध भारतीय स्थळे, पुणे, २०१६.
२. पालांडे आनंद,भारतातील जागतिक वारसा स्थळे, प्रफुलता प्रकाशन, मुंबई, २०१२.
३. सरदेसाई बी. एन, मराठ्यांचा सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक इतिहास, कोल्हापूर, २००१.
४. Sharma K.K, Tourism and Development in India, New Delhi, 2005.
५. Ray H.P & Manoj Kumar (Ed), Indian World Heritage Sites Context, New Delhi, 2014.